मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दिनांक ८ डिसेंबर २०२३ । पान १

# शहरातील विकासकामांसाठी कालबद्ध नियोजनाची गरज!

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांची सूचना; आयुक्तांसोबत विकासकामांची पाहणी

मनीषा थोरात-पिसाळ

**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पिंपरी-चिंचवड महापालिकेत प्रशासकीय राजवट सुरू आहे. त्यामुळे प्रशासनाने नागरिकांना पायाभूत सोयी-सुविधा देण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करावा. ज्याद्वारे विकासकामांना गती देता येईल. शहराच्या सर्वांगीण विकासासाच्या दृष्टीने सकारात्मक भूमिकेतून प्रकल्प मार्गी लावावेत, अशी सूचना भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केली. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या समवेत भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी नवी सांगवी परिसरातील विविध प्रस्तावित विकासकामांची पहाणी केली.



पहाणी दौऱ्यामध्ये सांगवी, नवी सांगवी, पिंपळे गुरव आदी ठिकाणच्या विकासकामांचा आढावा घेतला. यावेळी माजी महापौर माई ढोरे, माजी स्थायी समिती सभापती राजेंद्र राजापूरे, माजी नगरसेवक सागर अंगोळकर, हर्षल ढोरे, उषा मुंडे, अंबरनाथ कांबळे, संतोष कांबळे, शारदा सोनावणे, श्री गणेश सहकारी बँकेचे संचालक संजय जगताप, माजी सिनेट सदस्य संतोष ढोरे, भाजपा शहर चिटणीस हिरेन सोनावणे, सामाजिक कार्यकर्ते जवाहर ढोरे यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते. यावेळी सांगवी येथील संगमनगर, ममतानगरमार्गे बोपोडी, औंधकडे जाणाऱ्या पुलाच्या संदर्भात चर्चा झाली. या पुलाच्या बाबतीत कृषी विभागाच्या काही तांत्रिक अडचणी असून, त्या लवकरच मार्गी लावण्यात येतील. तसेच, मधुबन सोसायटी गल्ली नंबर १ ते ९ येथील १२ मीटरचा रस्ता, नवी सांगवी येथील कृष्णा चौक येथे २० मीटरच्या रस्त्यासंदर्भात तसेच रामनगर-यमुना सोसायटी, मयूर नगरीच्या शेजारचा रस्त्याच्या कामाला गती देण्याबाबतही चर्चा करण्यात आली. शंकर जगताप म्हणाले की, नागरिकांना पायाभूत सुविधा सक्षमपणे उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रशासनाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून आम्ही पाठपुरावा करीत आहोत. यामुळे शहरातील नागरिकांना मिळणाऱ्या सुविधा या दर्जेदार असाव्यात, यासाठी आम्ही नेहमीच आग्रही आहोत. किमान पुढील ५० वर्षांचा विचार करून प्रशासनाने मुलभूत सुविधांची निर्मिती करावी, अशी अपेक्षा आहे.

> “ शहराचे वाढते नागरीकरण आणि वाहतूक समस्या याचा विचार करुन महापालिका प्रशासनाने प्रस्तावित रस्ते आणि नदी पात्रावरील पुलांची कामे तातडीने हाती घेतली पाहिजेत. तसेच, मुख्य रस्त्यांना पर्यायी रस्ते उपलब्ध करण्याबाबत पुढाकार घेतला पाहिजे. या दृष्टीकोनातून प्रशासकीय प्रमुख शेखर सिंह यांच्यासोबत सकारात्मक चर्चा झाली. आगामी काळात निश्चितपणे प्रस्तावित कामांना गती दिली जाईल.
>
> – शंकर जगताप, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# चीनमध्ये पिंपरी-चिंचवडचा शहराचा डंका!

## ग्वांगझू आंतरराष्ट्रीय पुरस्कार स्पर्धेमध्ये पिंपरी- चिंचवडचा सन्मान

पिंपरी-चिंचवड

**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

चिंचवड महापालिकेच्या वतीने राबविण्यात आलेल्या नवी दिशा या उपक्रमाची दखल जागतिक पातळीवर घेण्यात आली असून ग्वांगझू आंतरराष्ट्रीय पुरस्कार स्पर्धेमध्ये पिंपरी- चिंचवड शहराला सन्मान पदकाने गौरविण्यात आले. चीनमधील ग्वांगझू येथे ग्वांगझू सचिवालयात हा सन्मान सोहळा पार पडला. महापालिकेच्या समाजविकास विभागाचे उप आयुक्त अजय चारठाणकर, आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे, समुह संघटिका वैशाली खरात आणि सीटीओच्या प्रज्ञा ठाकूर यांनी आयुक्तांच्या वतीने हा पुरस्कार स्विकारला. नागरी सहभाग आणि सहकार्यामुळे महा पालिकेला मिळालेला हा बहुमान असून शहरवासीयांप्रती आयुक्त शेखर सिंह यांनी पुरस्कारप्राप्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. महापालिकेच्या वतीने नवी दिशा उपक्रम राबविला जात आहे. या माध्यमातून शहरातील सामुदायिक शौचालयांचे देखभाल करण्याचे काम आर्थिक मोबदला देऊन महिला बचत गटांना देण्यात येत आहे. यामुळे महिलांना आर्थिक उत्पन्नाची संधी उपलब्ध झाली आहे. या महत्वाकांक्षी उपक्रमाची दखल जागतिक पातळीवर घेण्यात आली. ग्वांगझू आंतरराष्ट्रीय पुरस्कार स्पर्धेमध्ये ५४ देशांतील १९३ शहरांचा समावेश होता, यामध्ये पिंपरी चिंचवड शहराने नाविन्यपूर्णता, परिणाम कारकता आणि शाश्वत शहरी विकासासाठी असलेली आपली वचनबद्धता दर्शवली. नवी दिशा उपक्रमाद्वारे महापालिकेने स्वच्छतेसोबत शहरातील महिला बचत गटांना रोजगार उपलब्ध करून देत कार्यक्षम प्रशासनाचे यश देखील अधोरेखित केले. या स्पर्धेच्या नियमांचे मूल्यमापन करण्यासाठी दिनांक ११ ते १४ सप्टेंबर २०२३ या कालावधीत गुआंगझो येथील आंतरराष्ट्रीय तज्ञांचा समावेश असलेल्या एका प्रतिष्ठित तांत्रिक समितीने पिंपरी चिंचवड शहराला भेट दिली होती. या समितीद्वारे नवकल्पना, परिणामकारकता, संदर्भ आणि प्रतिकृती यांसारख्या निकषांचे मुल्यमापन शाश्वत विकास उद्दिष्टे आणि शहरी नवोपक्रमांतर्गत करण्यात आले.

# हिवाळी अधिवेशन सुरू झाले तरी पावसाळी अधिवेशनातील घोषणा हवेतच

## पिंपरी- चिंचवडकरांकडून ४७ कोटी सेवाशुल्क वसूल

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

महापालिकेने पूर्वलक्ष्यी प्रभावाने सुरू केलेल्या कचरा सेवा शुल्क वसुलीच्या स्थगितीची राज्य शासनाने पावसाळी अधिवेशनात केलेली घोषणा हिवाळी अधिवेशन आले, तरी हवेतच राहिली. स्थगितीचा आदेश नसल्याने सेवा शुल्काची वसुली सुरूच आहे. आतापर्यंत तीन लाख ७० हजार ८९४ मालमत्ताधारकांनी ४६ कोटी ६७ लाखांच्या शुल्काचा भरणा केला आहे. या वसुलीला गृहनिर्माण सोसायट्यांचा तीव्र विरोध आहे. राज्य सरकारच्या १ जुलै २०१९ रोजीच्या निर्णयानुसार, महापालिकां साठी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) व आरोग्य उपविधी कचरा सेवा शुल्क (उपयोगकर्ता) निर्धारित केले. त्यानुसार पिंपरी महापालिका सभेने २० ऑक्टोबर २०२१ रोजीच्या ठरावानुसार शुल्क वसूल करण्यास मान्यता दिली आहे. दि. १ एप्रिल २०२३ पासून वर्गीकृत कचरा सेवाशुल्क हे कर आकारणीच्या देयकांमधून वसुलीचा निर्णय घेतला. शहरात सहा लाख दोन हजार मालमत्ता आहेत. घरटी दरमहा ६० रुपये व व्यावसायिक आस्थापना असलेल्या मालमत्तांना आकारमानानुसार शुल्क आकारण्यात येत आहे. पूर्वलक्ष्यी प्रभावाने २०१९ पासून २०२३ पर्यंत चार वर्षांचे शुल्क आकारण्यात येणार आहे. त्यानुसार शुल्क वसुलीस सुरुवात केली. मात्र, चार वर्षांचे शुल्क आकारण्यास शहरातील गृहनिर्माण सोसायटीधारकांनी तीव्र विरोध केला. पावसाळी अधिवेशनात भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी लक्षवेधी सादर केली होती. या लक्षवेधीवर उत्तर देताना मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची सविस्तर बैठक घेण्यात येईल. त्यानंतर नियम व अटींची पडताळणी करून याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल. तोपर्यंत शुल्कवसुलीला स्थगिती देण्याची घोषणा मंत्री उदय सामंत यांनी केली. मात्र, शुल्क वसुली स्थगितीचा आदेश महापालिकेला मिळाला नाही. परिणामी, शुल्काची वसुली सुरूच राहिली. आजपासून हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होत आहे. त्यामुळे सरकारने पाच डिसेंबर रोजी महापालिकेला तातडीने ई-मेलद्वारे कचरा सेवा शुल्काची माहिती मागितली आहे.




### शुल्क वसूल करण्यास मान्यता

» आतापर्यंत तीन लाख ७० हजार ८९४ मालमत्ताधारकांनी ४६ कोटी ६७ लाखांच्या शुल्काचा भरणा केला आहे. या वसुलीला गृहनिर्माण सोसायट्यांचा तीव्र विरोध आहे. राज्य सरकारच्या १ जुलै २०१९ रोजीच्या निर्णयानुसार, महापालिकां साठी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) व आरोग्य उपविधी कचरा सेवा शुल्क (उपयोगकर्ता) निर्धारित केले. त्यानुसार पिंपरी महापालिका सभेने २० ऑक्टोबर २०२१ रोजीच्या ठरावानुसार शुल्क वसूल करण्यास मान्यता दिली आहे. दि. १ एप्रिल २०२३ पासून वर्गीकृत कचरा सेवाशुल्क हे कर आकारणीच्या देयकांमधून वसुलीचा निर्णय घेतला.

# पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी समिती गठित!

## विभागीय आयुक्त घेणार दोन महिन्याला आढावा

**पिंपरी-चिंचवड ।**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पिंपरी-चिंचवड शहरातील पाण्याचा प्रश्न (झउचउ) सोडविण्यासाठी समिती गठित करण्यात आली आहे. विभागीय आयुक्त सौरभ राव दर दोन महिन्याला त्याबाबतचा आढावा घेणार आहेत. शहरातील हौसिंग सौसायटी फेडरेशनने मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. या याचिकेवरील झालेल्या सुनावणीमध्ये पुणे जिल्ह्यातील पाणी पुरवठा समस्यांबाबत समिती गठीत करण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. त्यानुसार विभागीय आयुक्त राव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. या समितीमध्ये महापालिका आयुक्त शेखर सिंह, मुख्य अभियंता श्रीकांत सवणे यांचा समावेश आहे. या समितीने दोन महिन्यातून एकदा बैठक घेऊन शहरातील पाणी कमतरता, तूट, पाणी टँकर सुविधाबाबत आढावा घ्यावा, असा आदेश न्यायालयाने दिला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार विभागीय आयुक्त राव यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवारी पुण्यात बैठक झाली. या बैठकीला आयुक्त सिंह, मुख्य अभियंता सवणे, कार्यकारी (झउचउ) अभियंता अजय सुर्यवंशी, रामनाथ टकले आदी अधिकारी उपस्थित होते. शहरातील ज्या भागात पाण्याच्या तक्रारी आहेत, त्या भागाची पाहणी करून पाणी प्रश्न सोडवा, असा आदेश विभागीय आयुक्त राव यांनी महापालिका प्रशासनाला दिला.



# चाकणकरांनी आम्हाला फसवले!

## संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक प्रदीप कानसेंचा दावा

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी खोट्या आरोपांमध्ये आम्हाला फसवले आहे. आम्ही कुठल्याही अश्लील टिप्पण्या केल्या नव्हत्या'' असं संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक प्रदीप कानसे यांनी सांगितलं. ते एबीपी माझाशी बोलत होते. रुपाली चाकणकर यांच्याबद्दल सोशल मीडियावर आक्षेपार्ह मजकूर प्रसिद्ध केल्याबद्दल प्रदीप कानसे यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. त्याबाबत प्रदीप कानसे हे आपली भूमिका मांडत आहेत. ''आम्ही स्त्रियांचा आदर करतो, जय जिजाऊ म्हणत आम्ही बोलायला सुरुवात करतो. आमचा आक्षेप रुपाली चाकणकर यांनी केलेल्या पोस्टवर होता. वामन बळीराजाच्या डोक्यावर पाय ठेवतो अशी पोस्ट त्यांनी दिवाळी मध्ये केली होती. त्यावर आमचा आक्षेप आहे, त्यांनी मला अडकवले आहे. माझी बदनामी केली आहे. रुपाली चाकणकर पदाचा फायदा घेतात, लोकांवर दबाव टाकतात, अन्याय करतात'', असा आरोप प्रदीप कानसे यांनी केला. रूपाली चाकणकर यांनी दिवाळीत बळी राजाच्या डोक्यावर पाय ठेवणाऱ्या वामनाचे चित्र पोस्ट केले होते. हे संकल्प चित्र बळीराजाबद्दलच्या ऐतिहासिक तथ्यांवर अन्याय करणारे असल्याचा दावा प्रदीप कानसे यांनी केला होता. मात्र पुणे सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. रुपाली चाकणकर यांच्याबद्दल सोशल मीडियावर आक्षेपार्ह मजकूर प्रसिद्ध केल्याचा त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला. मात्र आपण रुपाली चाकणकर यांच्याबद्दल कोणतेही आक्षेपार्ह लिखाण केले नाही असा दावा प्रदीप कणसे यांनी केला. रुपाली चाकणकर यांच्याबद्दल सोशल मीडियावर अश्लील मजकूर प्रसिद्ध करणाऱ्या व्यक्तींचा



आणि आपला कोणताही संबंध नसल्याचेही प्रदीप कणसे यांनी म्हटलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नेत्या आणि राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्याविषयी समाजमाध्यमात अश्लील मजकूर प्रसारित केल्याप्रकरणी पुणे सायबर पोलीसांनी गुन्हा दाखल करून चौघांना ताब्यात घेतलं. रुपाली चाकणकर यांच्या बाबतीतील अश्लील पोस्ट विकास सावंत, जयंत पाटील, रणजीतराजे हात्तींबरे, अमोल के. पाटील यांनी फेसबुकवर शेअर केली होती. या चौघांवर पुणे सायबर पोलीस ठाण्यात आयपीसी ३५४ (अ) आणि ५०९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत रुपाली चाकणकर यांचे भाऊ संतोष बबन बोराटे यांनी पुणे सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. यातील संशयित असलेल्या जयंत पाटील, रणजीतराजे हात्तींबरे आणि अमोल पाटील यांच्या सोशल मीडिया अकाउंटवरून, त्यांचे मोबाईल क्रमांक सायबर पोलिसांनी मिळवले. त्याआधारे पोलीस पोलिसांनी जयंत रामचंद्र पाटील या सांगली जिल्ह्यातील धनगरवाडीत राहणाऱ्या आरोपीपर्यंत पोहोचले . त्याला ताब्यात घेतले असता तपसादरम्यान तो मानसिक रुग्ण असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याला सी.आर. पी.सी प्रमाणे नोटीस देऊन त्याचा जबाब नोंदवून मोबाईल जप्त केला. तसेच सोशल मीडिया पोस्टवर अश्लील भाषेत कमेंट केलेल्या फेसबुक युजर नावाचे अकाऊंट असलेल्या संशयित व्यक्तीची फेसबुक कंपनीकडून तांत्रिक माहिती घेण्यात आली. पोलिसांनी वसंत रमेशराव खुळे वय-३४ रा. रहाटी, ता.जि. परभणी याचा शोध घेतला असता, आरोप रहाटी येथे असल्याची माहिती मिळाली.

### नेमकं प्रकरण काय?

**» पोलिसांच्या पथकाने रहाटी येथे जाऊन आरोपीला ताब्यात घेतले. त्याला सायबर पोलीस ठाण्यात आणून त्याचा जबाब नोंदवून घेत फोन जप्त केला. त्याला सी.आर.पी.सी प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे. याशिवाय फेसबुक युजर प्रदीप कणसे नावाने पोस्टवर अश्लील भाषेत कमेंट करण्यात आली होती. पोलिसांनी हे फेसबुक अकाऊंट वापरणाऱ्या संशयिताचा मोबाईल क्रमांक प्राप्त करुन त्याला देखील सी.आर.पी.सी प्रमाणे नोटीस दिली. सायबर पोलिसांनी रुपाली चाकणकर यांच्या विरोधात फेसबुकवर अश्लिल पोस्ट करणाऱ्या आरोपींचा शोध घेऊन तांत्रिक विश्लेषणाद्वारे त्यांचा माग काढून गुन्हा उघडकीस आणला.**

# धंगेकर डॉक्टरांच्या वेशभूषेत पोहचले विधानभवनात

## ललित पाटील प्रकरणात सखोल चौकशी करण्याची मागणी

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** आजपासून हिवाळी अधिवेशनाला सुरवात होत असून, पुण्यातील काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर हे स्टेथोस्कोप आणि एप्रन घालून डॉक्टरांच्या वेशभूषेत विधानभवनात पोहचले आहेत. ललित पाटील प्रकरणात सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यासाठी त्यांनी डॉक्टरांच्या वेशभूषेत विधानभवन गाठत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तर, ललित पाटील यांना पंचतारांकित सेवा रोहित पाटील यांना दिली होती, संजीव ठाकूर (डरपक्षशर्शी ढहरर्ज्ञीअ) यांना अटक करावी यासाठी रस्त्यावर आम्ही आलो असल्याचे त्यांनी सांगितले. शिवाय संजीव ठाकूर यांना ज्यांनी-ज्यांनी फोन केले, कोण कोण यामध्ये होते त्या सगळ्यांची चौकशी व्हावी या मागणीचं लक्ष वेधण्यासाठी मी आज अधिवेशनात अशाप्रकारे आलो असल्याचं धंगेकर यांनी सांगितलं. पुढे बोलतांना ते म्हणाले की, ललित पाटील ससून रुग्णालयातून पळून गेला. ससून रुग्णालयाच्या 'डीन'ने





तब्बल नऊ महिने ललित पाटील याला पंचकारित सेवा दिली होती. यासाठी सातत्याने आम्ही आवाज उठवत आहोत. याप्रकरणी आतापर्यंत अनेक लोकांना अटक देखील झाली आहे. मात्र संजीव ठाकूर यांना आत्तापर्यंत अटक झालेली नाही. या मागणीसाठी आम्ही सातत्याने रस्त्यावर उतरलो. आज अधिवेशनाचा पहिला दिवस आहे. या प्रकरणात सरकारचं लक्ष गेलं पाहिजे आणि संजीव ठाकूर यांना ज्याज्या मंत्र्यांनी फोन केले त्यांची देखील चौकशी झाली पाहिजे, असे धंगेकर म्हणाले. तर, अनेकांची चौकशी सुरू आहे. आत्तापर्यंत ३० पेक्षा अधिक लोकांना अटक करण्यात आली आहे. पण संजीव ठाकूर यांना देखील अटक केली पाहिजे. तसेच त्यांना ज्यांनी-ज्यांनी फोन केले आणि ललित पाटील याला ससून रुग्णालयात ठेवण्यासाठी मदत केली त्यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे. तुरुंगात असताना डॉक्टरांना ज्यांनी फोन केले, तसेच ललित पाटीलला अटक केल्यानंतर पोलिसांना ज्यांनी फोन केले त्यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी धंगेकर यांनी केली आहे. रवींद्र धंगेकर हे स्टेथोस्कोप आणि एप्रन घालून डॉक्टरांच्या वेशभूषेत विधानभवनात पोहचल्यावर त्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तसेच, त्यांच्या एप्रनवर ''ललित पाटील याला संरक्षण देणाऱ्या मंत्र्यांवर कारवाई झालीच पाहिजे'' असे लिहण्यात आल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे मागील काही दिवसांपासून ललित पाटील प्रकरणात आक्रमक होणारे ललित पाटील आता अधिवेशनात देखील आक्रमक भूमिका घेतांना पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

# माढ्यातून पुन्हा विद्यमान खासदारांना संधी!

## माढ्यामध्ये भाजपमधील अंतर्गत गटबाजी उफाळून येण्याची चिन्हे

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** माढा लोकसभेचे विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी चांगले काम केले असून येणार्या निवडणुकीत ते गतवेळीपेक्षा जास्त मतांनी निवडून येतील, असा विश्वास भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी पुण्यात व्यक्त केला. तसेच अकलूजच्या मोहिते पाटील घरातून लोकसभा निवडणूक लढवण्याचा दावा केला जात असल्याच्या प्रश्नावर मात्र बोलणे टाळत बावनकुळे यांनी विद्यमान खासदारांनाच पसंती दिली. त्यामुळे माढ्यामध्ये भाजपमधील अंतर्गत गटबाजी उफाळून येण्याची चिन्हे दिसत आहेत. माढा लोकसभा मतदार संघाची निर्मिती झाल्यानंतर या मतदार संघाचे प्रतिनिधीत्व राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांनी केले. मात्र, मागील निवडणुकीमध्ये अनेक राजकीय घडामोडी घडल्यानंतर मोहिते-पाटील घराणे भाजपमध्ये सामिल झाले. राष्ट्रवादीचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणार्या माढा लोकसभेसाठी भाजपने फलटणचे रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना रिंगणात उतरवले. तर राष्ट्रवादीने संजय शिंदे यांना उमेदवारी दिली. प्रतिष्ठेच्या लढतीमध्ये मोहिते-पाटील यांनी



भाजपच्या मागे संपूर्ण शक्ति लावत एकट्या माळशिरस विधानसभा मतदार संघातून निंबाळकर यांना एक लाखाचे मताधिक्य मिळवून दिले. मात्र, त्यानंतर निंबाळकर आणि मोहिते-पाटील यांच्यात सुप्त राजकीय संघर्ष झाला. मोहिते-पाटील घराण्याचे राजकीय विरोध असलेले माढ्याचे आमदार बबनराव शिंदे व करमाळ्याचे आमदार संजय शिंदे यांच्याशी जवळीक साधून निंबाळकर मोहिते-पाटील यांना शह देत असल्याची माढ्यात चर्चा सुरू आहे. निंबाळकर आणि शिंदे यांच्या जवळकीच्या पार्श्वभूमीवर विजयसिंह मोहिते पाटील यांचे पुतणे व भाजपचे सोलापूर जिल्हा संघटक सचिव धैर्यशील मोहिते पाटील यांनी दिवाळीचा मुहूर्त साधून माढा लोकसभा लढवण्याचे जाहीर केले आहे. निवडणुक लढवण्याच्या दृष्टीने आपण साडेतीन वर्षापासून मतदार संघात संपर्क वाढवून मोर्चेबांधणी केली आहे. त्यामुळे खासदारकीची संधी अपणास मिळणार, असा दावा केला होता. त्यामुळे माढा मतदार संघात भाजप जागा राखण्यासाठी कुणाला संधी देणार? विद्यमान खासदारांना संधी दिली तर मोहिते-पाटील मदत करणार का? मोहिते-पाटील यांना उमेदवारी दिली तर नाईक निंबाळकर काय करणार? असे प्रश्न उपस्थित झाले आहेत. या पार्श्वभूमीवर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुण्यातील एका कार्यक्रमात गुरुवारी निंबाळकर सहभागी झाले होते. यावेळी दैनिक पुढारीच्या प्रतिनिधीने माढा लोकसभा मतदार संघात विद्यमान खासदार व मोहिते-पाटील यांच्यामध्ये सुरू असलेल्या संघर्ष आणि आगामी निवडणुकीतील उमेदवार या संदर्भात विचारणा केली. यावेळी बावनकुळे यांनी निंबाळकर यांच्या कामाचे कौतुक करत आगामी निवडणुकीत ते गतवेळीपेक्षा अधिक मताने निवडून येतील, असा विश्वास व्यक्त केला. बावनकुळे म्हणाले, माढा लोकसभा मतदार संघात निंबाळकर यांनी आजवर जेव्हढी कामे झाली नाहीत, तेव्हढी कामे केली आहेत.

# ससूनचे माजी डीन संजीव ठाकूरांच्या मुलाचाही राजीनामा

## ड्रग्ज माफिया ललित पाटील प्रकरणात संजीव ठाकूर पदमुक्त

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** ललित पाटील प्रकरणात पदमुक्त करण्यात आलेले ससूनचे माजी डीन संजीव ठाकूर यांच्या मुलाने राजीनामा दिला आहे. डॉ. अमेय ठाकूर असे मुलाचे नाव असून ते बी जे मेडिकल कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणूक कार्यरत होते. त्यांनी बी जे मेडिकल कॉलेजमधील प्राध्यापक पदाचा राजीनामा दिला आहे. राजीनाम्याचे कारण समोर न आल्याने अनेक चर्चांना उधाण आले आहे. डॉक्टर संजीव ठाकूर पुण्यात ससून रुग्णालयाचे डीन म्हणून रुजू झाल्यानंतर डॉक्टर अमेय ठाकूर हे बी जे वैद्यकीय महाविद्यालयात





प्राध्यापक म्हणून रुजू झाले होते. त्याआधी डॉक्टर संजीव ठाकूर सोलापूरला शासकीय रुग्णालयात डीन म्हणून असताना डॉक्टर अमेय ठाकूर तिथल्या वैद्यकीय महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करत होते. ज्याला सोलापुरातील काही डॉक्टरांनी आक्षेप घेतला होता. डॉक्टर अमेय ठाकूर यांची वैद्यकीय महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नियुक्ती त्यांचे वडील डॉक्टर संजीव ठाकूर यांच्या प्रभावातून झाल्याचा आरोप होत होता. अखेर त्यांनी राजीनामा दिला आहे. ससून रुग्णालयात अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर आणि मुलगा डा. अमेय ठाकूर या पितापुत्रांसाठी रुग्णालयात विशेष सेवा असल्याच्या चर्चा समोर आल्या होत्या. ठाकूर पितापुत्रांन शस्त्रक्रिया करण्यासाठी स्वतंत्र ऑपरेशन थिएटर देण्यात आले होते. हे ऑपरेशन थिएटर फक्त ठाकूर पितापुत्र वापरत होते. दुसर्या डॉक्टरांना हे ऑपरेशन थिएटर वापरण्याची परवानगी नव्हती. हे दुसर्या डॉक्टरांना देण्यात आले त्यावर चावी देणाऱ्या कर्मचाऱ्याला मेमो देत समज देण्यात आली होती. ससून रुग्णालयाचे डीन डॉ. संजीव ठाकूर यांची अधिष्ठातापदावरून उचलबंगडी करण्यात आली आहे. उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर त्यांना अधिष्ठातापदावरून हटवण्यात आलं आहे.

ललित पाटील प्रकरणामुळे संजीव ठाकूर चर्चेत होते. त्यांच्या जागी आता पुर्वीचे अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांची अधिष्ठातापदावर नियुक्ती करण्यात आली आहे. मागील काही दिवसांपासून संजीव ठाकूर हे नाव चांगलंच चर्चेत होते. पूर्वीचे अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांची मध्यावधी बदली झाली होती.

त्या विरोधात त्यांनी मॅटमध्ये दावा दाखल केला. मॅटने डॉ. काळे यांच्या बाजूने निकाल दिला. मात्र, त्या विरोधात डॉ. ठाकूर यांनी उच्च न्यायालयाकडे दाद मागितली होती. त्याचा निकाल आज न्यायालयाने दिला. त्यात पून्हा अधिष्ठातापदी डॉ. काळे यांना नियुक्त करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.